# बैठकीचा कार्यवृत्तांत

राज्यातील सर्व अकृषी विद्यापीठे, अभिमत विद्यापीठे, स्वयंअर्थसहाय्यित विद्यापीठे व त्यांच्याशी संलग्नित महाविद्यालयांतील नियमित वर्ग सुरू करण्याबाबत महाराष्ट्र शासन उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांचे शासन परिपत्रक क्रमांक : संकीर्ण 2021 / प्र.क्र.6. / विशि-3 दिनांक 3 फेब्रुवारी 2021 रोजीचे परिपत्रकान्वये संलग्नित महाविद्यालये व विद्यापीठ अधिविभाग यांचे नियमित वर्ग सुरू करण्यासाठी प्राचार्य, डॉ. डी.जी.कणसे (अध्यक्ष) यांच्या अध्यक्षतेखाली गठीत समितीची बैठक शनिवार दिनांक 6/2/2021 रोजी सकाळी 11.30 वाजता राजर्षी शाहू सभागृहामध्ये आयोजित करण्यात आली होती.

सदर बैठकीस खालीलप्रमाणे समिती सदस्य उपस्थित होते.

1. प्राचार्य, डॉ. डी.जी.कणसे (अध्यक्ष)
   भारती विद्यापीठाचे डॉ पतंगराव कदम महाविद्यालय, सांगलवाडी, सांगली जिल्हा-सांगली
2. श्रीमती प्रा.डॉ. वर्षा जाधव अधिविभाग प्रमुख वनस्पतीशास्त्र अधिविभाग शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
3. डॉ. ए.एम. सरवदे अधिविभाग प्रमुख, इंग्रजी अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर
4. प्राचार्य डॉ. एच.एन. मोरे भारती विद्यापीठाचे कॉलेज ऑफ फॉर्मसी, मोरेवाडी, कोल्हापूर
5. प्राचार्य डॉ. पी.व्ही. कडोले दत्ताजीराव कदम टेक्निकल एज्युकेशन सोसायटीचे टेक्सटाईल ॲन्ड इंजिनिअरींग इन्स्टिट्युट, राजवाडा चौक, इचलकरंजी
6. श्री. एम.पी. कदम उपकुलसचिव, संलग्नता टी-1 विभाग, सदस्य सचिव

राज्यातील सर्व अकृषी विद्यापीठे, अभिमत विद्यापीठे, स्वयंअर्थसहाय्यित विद्यापीठे व त्यांच्याशी संलग्नित महाविद्यालयांतील नियमित वर्ग सुरू करण्याबाबत महाराष्ट्र शासन उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांचे शासन परिपत्रक क्रमांक : संकीर्ण 2021 / प्र.क्र.6. / विशि-3 दिनांक 3 फेब्रुवारी 2021 रोजीचे परिपत्रक , परिपत्रकासोबत मा.मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांचे अध्यक्षतेखाली दि.1 फेब्रुवारी 2021 रोजी झालेल्या बैठकीचे इतिवृत्त व शासन परिपत्रकामध्ये नमूद विद्यापीठ अनुदान आयोगाच्या दिनांक 5 नोव्हेंबर 2020 रोजीच्या मार्गदर्शक सूचनांवर समिती सदस्यांनी चर्चा करून खालीलप्रमाणे शिफारशी करण्यात आल्या.

१. राज्यातील सर्व अकृषी विद्यापीठे, अभिमत विद्यापीठे, स्वयंअर्थसहाय्यित विद्यापीठे व त्यांच्याशी संलग्नित महाविद्यालयातील नियमित वर्ग सुरू करण्याबाबत महाराष्ट्र शासन उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांचे शासन परिपत्रक क्रमांक : संकीर्ण 2021 / प्र.क्र.6. / विशि-3 दिनांक 3 फेब्रुवारी 2021 रोजीचे परिपत्रक , परिपत्रकासोबत मा.मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांचे अध्यक्षतेखाली दि.1 फेब्रुवारी 2021 रोजी झालेल्या बैठकीचे इतिवृत्त व शासन परिपत्रकामध्ये नमूद विद्यापीठ अनुदान आयोगाच्या दिनांक 5 नोव्हेंबर 2020 रोजीच्या मार्गदर्शक सूचनांचे,तसेच सर्व विद्याशाखांचे शिखर संस्थांमार्फत निर्गमित करण्यात आलेल्या मार्गदर्शक सूचनांचे काटेकोर पालन करून दिनांक 15 फेब्रुवारी 2021 पासून संलग्नित महाविद्यालये व विद्यापीठ अधिविभाग सूरू करण्याबाबत शिफारस करण्यात येत आहे.

२. दिनांक 3 फेब्रुवारी 2021 रोजीचे परिपत्रक , परिपत्रकासोबत मा.मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांचे अध्यक्षतेखाली दि.1 फेब्रुवारी 2021 रोजी झालेल्या बैठकीचे इतिवृत्तांमधील निर्णय क्रमांक 6 मध्ये विद्यापीठ अनुदान आयोगाच्या सूचनांप्रमाणे पदवी / पदव्युत्तर अभ्यासक्रम किती कमी करावयाच्या याबाबत त्या-त्या विद्यापीठांनी निर्णय घ्यावा. असे नमूद केलेले आहे.या बाबतचा उचित निर्णय घेण्याबाबत समिती विद्यापरिषदेस शिफारस करीत आहे.

३. अध्यापनाच्या बाबत संबंधित महाविद्यालये व विद्यापीठ अधिविभाग यांनी त्यांच्या स्तरावर निर्णय घेण्याबाबत समिती शिफारस करत आहे.

उपरोक्त शिफाराशींना सर्व उपस्थित समिती सदस्यांनी सहमती दर्शविल्यानंतर श्री. एम.पी.कदम उपकुलसचिव यांनी उपस्थित सर्व सदस्यांचे आभार मानले व बैठक संपन्न झाल्याचे घोषित केले.

सही/-
प्राचार्य डॉ. डी.जी.कणसे
(अध्यक्ष)